**सुभाषित -**

मनसि वचसि काये पुण्यपीयुषपूर्णा-
स्त्रिभुवनमुपकारश्रेणिभि: प्रीणयन्त: ।
परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं
निजहृदि विकसन्त: सन्ति सन्त: कियन्त: ॥

**अर्थ -**

मन, वाचा आणि काया यांच्यामध्ये पुण्यरुपी अमृताने पूर्णपणे भरलेले, (स्वर्ग, पृथ्वी, पाताळ) या तिन्ही भुवनांना आपल्या उपकारांच्या मालिकांनी आनंदित करणारे, दुसऱ्यांचे परमाणूएवढे लहान असणारे गुण पर्वताएवढे मोठे करून स्वत:च्या हृदयात विकास पावणारे सज्जन कितीसे आहेत बरे ?